# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २२, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) आदिवासी विकास मंत्री**<br>**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**<br>**(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**<br>**(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५६**

---

### परतवाडा (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथे आदिवासी वसतीगृह बांधण्यासाठी जागेचे हस्तांतरण करणेबाबत

**(१) * १००४८९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथे आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या २.५ एकर जागेपैकी अर्धा एकर जागा आदिवासी विकास विभागाकडे हस्तांतरीत करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचेकडे दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या जागेवर आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी आरक्षण निश्चित करण्याचा निर्णय दिनांक २ मे, २०१३ रोजीच्या शासन

निर्णयाद्वारे जाहीर केल्यानंतरही अद्यापपर्यंत जागेचे हस्तांतरण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त जमिनीचे हस्तांतरण तातडीने होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) यासंदर्भात शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्रक्र.२०७/बांधकामे, दि. २.१२.२०१७ अन्वये आदिवासी विभागाकडून आदिवासी वसतीगृह (मुला-मुलींचे) मागणीचा प्रस्ताव सादर करणे तसेच सा.न्या. व आदिवासी विकास विभाग या दोन्ही वसतीगृहांच्या एकत्रित वास्तुमांडणी आराखडा सादर करावा, असे आदिवासी विकास विभागास कळविण्यात आले आहे. तद्नंतर सदर आराखडयाचे अवलोकन करुन जागा हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील मान्यता नसलेल्या वसतीगृहांच्या संचालकांनी केलेला गैरव्यवहार

**(२) * ९७०५०   डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :**   सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागांतर्गत मान्यता नसलेल्या ८२ वसतीगृहांच्या संचालकांनी मागील अनेक वर्षांपासून प्रादेशिक समाजकल्याण अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर यांनी शासनाकडे या संदर्भाचा अहवाल सादर केला असून सदर बाबीकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषी संचालकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) विभागांतर्गत काही अनुदानित वसतीगृहांकडे मूळ मान्यता आदेश नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वसतीगृहांची प्रादेशिक उपायुक्त / उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्यामार्फत तपासणी करण्यात आलेली आहे.

यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.राज्यमंत्री, सा.न्या. यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील खातेदारांच्या नावावर कर्ज काढून पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी केलेला गैरव्यवहार

**(३) * ९८४८९ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील खातेदारांच्या नावावर परस्पर कर्ज काढून पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे बँकेच्या दक्षता पथकाने केलेल्या चौकशीतून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेअंतर्गत दक्षता पथकाने बँकेच्या शाखेमधील कर्ज प्रकरणाची चौकशी केल्याचे खरे आहे. तथापि, या चौकशीमध्ये बँक पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) होय. बँकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) चौकशीमध्ये कर्जप्रकरणात तांत्रिक अनियमितता आढळल्याने बँकेने दोन शाखा व्यवस्थापकांना निलंबित केले असून बँकेमार्फत खातेनिहाय चौकशीची कारवाई चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बल्लाशा (जि.चंद्रपूर) येथील कस्तुरबा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स या संस्थेने शिष्यवृत्तीचा केलेला अपहार

**(४) * ९८८५७ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लाशा (जि.चंद्रपूर) येथील कस्तुरबा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स या महाविद्यालयास शासनाची व विद्यापीठाची मान्यता नसतांना कोणत्याही मुळ परवानगी पत्राची पडताळणी न करता समाजकल्याण विभाग, चंद्रपूर यांच्याकडून सन २००७-२००८ व २००८-२००९ या कालावधीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीची आगाऊ रक्कम घेऊन उक्त संस्थेने अपहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपहार संस्था चालक व समाजकल्याण अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## देवघर (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे बेकायदेशीररित्या गावठी दारुचा व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(५) * १०१२४० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवघर (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे मोठया प्रमाणावर बेकायदेशीर व अवैध गावठी दारुचा व्यवसाय सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध व्यवसायाने महिला व मुलांवर विपरित परिणाम होत असल्याने तेथील महिलांनी हा व्यवसाय बंद करण्यासाठी प्रयत्न केले असता आंबिवली पोलिस दूरक्षेत्रातील कर्मचारी सदर प्रकरणी सहकार्य करत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दरम्यानच्या कालावधीत देवघर पाचीचा माळ येथे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी ग्रामस्थांनी नवसागर व गुळाचे रसायन तयार करणाऱ्यांना पकडून दिले असून पोलिसांनी धाड टाकली असता सुमारे २२ हजार ८०० रुपयांचा गुळ व नवसागर मिश्रित माल पकडला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली व ग्रामस्थांनी दारुबंदी करण्याबाबत ठराव करुन पोलीसांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने या परिसरात दारुबंदी करण्यासह संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) हे खरे नाही. याअनुषंगाने पोलीस विभाग तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वेळोवेळी कारवाई करण्यात येते. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०१५ ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत २२ गुन्हे नोंदविले असून ३ आरोपींना रु.४.१४ लक्ष किंमतीच्या मुद्देमालासह अटक केली आहे. तसेच, पोलीस विभागाने केलेल्या कारवाईत दि.१४.६.२०१६ रोजी देवघर येथील कोंढबा या

ठिकाणी दोन आरोपींना तसेच दि.४.४.२०१७ रोजी देवघर पाचाचा माळ येथे एका आरोपीस मुद्देमालासकट अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींवर मुंबई मद्य निषेध कायद्यातील कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) व (४) होय. दि.७.१०.२०१७ रोजी शिवगण व देवघर पाचाचा माळ येथे ग्रामस्थांनी छापा टाकून तीन आरोपींना रु.६४,२००/- किंमतीच्या मुद्देमालांसह पकडून दिले असून पोलीस विभागाकडून त्यांचेवर मुंबई मद्य निषेध कायद्यातील कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवघर, तालुका खेड, जि.रत्नागिरी येथील अवैध दारुधंदे बंद करण्याबाबत ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करून वेळोवेळी गस्त घालून कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील 'मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती' प्रशासनाने सेवाकर वसूलीमध्ये केलेला गैरव्यवहार

**(६) * ९५२७२ श्री.मनोहर भोईर (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील 'मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती' प्रशासनाने व्यापाऱ्यांशी संगनमत करुन  सेवाकर वसूलीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारात चटईक्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) आणि बोगस ठेवीवरील कर्ज यासंदर्भातील गैरव्यवहारांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी बाजार समितीचे प्रशासक यांनी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी समितीने केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२), (३) व (४) सेवाशुल्क आकारणी/वसूली बाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल घेण्यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दि.२८.९.२०१७ रोजीच्या आदेशान्वये द्विसदस्यीय समिती नेमण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल अद्यापि प्राप्त झालेला नाही.या प्रकरणी आवश्यकता असल्यास शासनामार्फत चौकशी करुन दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

तसेच चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असून देना बँकेतील ठेवीबाबतचे प्रकरणात सीबीआय मार्फत तपास होऊन विशेष न्यायालय, मुंबई येथे आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. दोन्ही बाबी न्यायप्रविष्ट आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हडपसर (जि.पुणे) येथील आदिवासी वसतीगृहातील असुविधांबाबत

**(७) * ९८९४१ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील आदिवासी वसतीगृहातील असुविधांबाबत विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उपोषण सुरु केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,राज्यातील विविध जिल्ह्यांतून १२५ हून अधिक विद्यार्थी येथे राहत असून त्यांना वेळेवर जेवण न मिळणे, वसतिगृहातील अस्वच्छता, पाणी न मिळणे, खोल्यांच्या पत्र्यांची दुरवस्था झाल्याने पावसाळ्यात ते गळत असणे इत्यादी गैरसोयींसंदर्भातील तक्रारींच्या निराकरणाकरिता वॉर्डन हजर नसणे याबाबत विद्यार्थांनी वसतीगृह प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरसोयींबाबत संबधित दोषींवर कारवाई करण्याबाबत व विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, हडपसर येथील विद्यार्थ्यांनी दि.०७.१०.२०१७ रोजी भोजनामध्ये दोन्ही वेळेस बटाटा मिक्स भाजी दिल्यामुळे उपोषण केले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात सदर वसतीगृहात ११५ विद्यार्थी प्रवेशित असून पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.फिल्टर, वॉटर कुलर उपलब्ध असून वापरासाठी महानगरपालिका तसेच बोअरवेलचे मुबलक पाणी उपलब्ध आहे. वसतीगृह स्वच्छतेसाठी नियमित सफाईकामगार आहे. सदर वसतीगृह भाड्याच्या इमारतीत कार्यरत असून येथील खोल्यांच्या पत्र्यांची दुरूस्ती करण्याबाबत गृहपाल यांनी इमारत मालकास सूचना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या तक्रारीनुसार संबंधित गृहपाल हे वेळेवर वसतीगृहात येत नसल्याने वसतीगृहातील सर्व कर्मचाऱ्यांना पूर्ण वेळ वसतीगृहात राहण्याबाबत सक्त सूचना दिल्या असून यापुढे सूचनांची अंमलबजावणी न केल्यास वेतन थांबविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# हिंगोली जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतील निधीबाबत

**(८) * ९६८९७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेतील १ कोटीचा निधी कामे रद्द केल्याने शासनास परत करावा लागला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अनेक गावांतील विकासकामे प्रलंबित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर निधीचे योग्य नियोजन व विनियोग न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) अपुरा निधी, जागेचा अभाव, ग्राम पंचायतीने विहित मुदतीत काम न करणे, स्थानिक अडचण व निवडणूक आचार संहिता या विविध कारणांमुळे ५ (पाच) पंचायत समित्यांकडील रद्द झालेल्या ३१ विकासकामांवर निधी खर्च करता आलेला नाही.याबाबत सदर पंचायत समित्यांच्या गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन निधी अखर्चित ठेवण्याबाबत, संबंधित ग्राम पंचायतींचे ग्रामसेवक यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून मागविण्यात आलेले खुलासे तपासून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२१/०९/२०१७ अन्वये अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली आयुक्त, समाजकल्याण यांचेकडून सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविण्यात आलेली आहे.

-----------------

## शासकीय परिवहन सेवा कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार

**(९) * ९६६९४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या राजशिष्टाचार विभागाच्या अखत्यारितील शासकीय परिवहन सेवा कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेत सुमारे ७९ लाख रुपयांहून अधिक रकमेचा अपहार सन २००८ ते २०१४ या कालावधीत झाल्याने सहाय्यक निबंधकामार्फत चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहाराची रक्कम वसुल करण्याचे आदेश दिनांक १ जून, २०१७ रोजी देऊनही उक्त रक्कमेपैकी कोणतीही रक्कम अद्यापपर्यंत वसूल झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपहाराची रक्कम वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी दिनांक २७.४.२०१७ रोजीच्या अहवालानुसार संस्थेच्या एकूण १७ संचालकांवर रु. ७९.६८ लक्ष इतकी आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित केली.

सदर रक्कम वसूल करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ९८ अन्वये संस्थेच्या एकूण १७ संचालकांविरुद्ध दिनांक १.६.२०१७ रोजी वसूली प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आलेली असून संबंधितांकडून रु. २,१०,०००/- मुद्दल व रु. ३,८५,५१०/- व्याज अशी एकूण रु. ५,९५,५१०/- रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. तसेच संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व), मुंबई येथील चकाला देवालंकार को.ऑ.हौ.सोसायटी या संस्थेने केलेला गैरव्यवहार

**(१०) * ९५९३८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चकाला देवालंकार को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट क्र.५, चकाला सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई या संस्थेचा पुनर्विकास श्री.नवकार बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्स या विकासकामार्फत करण्यात येत असून विकासकाने संस्थेस ५० लाख रुपयांचा कॉर्पस फंड दिनांक ११ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने त्यात ३० लाखांचा गैरव्यवहार केला असून त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक सभासदांनी व लोकप्रतिनिधींनी, मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, प्रधान सचिव, सहकार विभाग, सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे दिनांक १४ मे, २०१७ व १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपनिबंधक सहकारी संस्था के/पूर्व वडाळा, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० व १६० अन्वये गैरव्यवहार झालेल्या हिशोबाचा ताबा तातडीने संस्थेच्या प्रशासनाकडे देण्यात यावा असे निर्देश देऊनही संस्थेच्या पूर्व पदाधिकाऱ्यांनी ताबा संस्थेच्या प्रशासकाकडे दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तहसिलदार अंधेरी (प.) यांनी महाराष्ट्र सहकारी अधिनियम, १९६० चे कलम ८०(२) अन्वये गैरव्यवहार झालेल्या हिशोबाच्या दप्तराचा ताबा प्रशासनाकडे देण्यात यावा असे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई यांना दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असूनही त्यांनी पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांकडे दप्तराचा ताबा दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) संस्थेच्या बँक खात्याच्या पासबुकातील उताराऱ्यावरुन असे दिसून येत नाही.

(२) होय.

(३) व (४) संस्थेच्या पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या दप्तराचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांना दिलेला होता. तथापि, पुनर्विकासाची कागदपत्रे त्यांना न मिळाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८० नुसार पोलीस खात्यामार्फत दप्तराचा ताबा घेण्याकरिता संस्थेचे सचिव यांचेकडे गेले असता त्यावर त्यांनी उर्वरीत दप्तर संस्थेच्या तत्कालीन चेअरमन व खजिनदार यांचेकडे असू शकेल असे सांगितले.

संस्थेची इमारत पुनर्विकासाकरिता निष्कासित करण्यात आली असून, सर्व पदाधिकारी/सभासद इतरत्र राहावयास गेले असल्याने, तसेच संस्थेचे चेअरमन/खजिनदार यांचे पत्ते उपलब्ध नसल्याने उर्वरित दप्तराचा ताबा घेणे शक्य झालेले नाही.

(५) संस्थेचा पुनर्विकास करताना विकासक व संस्थेचे सभासद यांचे दरम्यान करार होत असतो. सदर करारातील अटी व शर्ती तसेच संस्थेच्या सभासदांना दयावयाच्या कॉर्पस फंडांबाबत काही आक्षेप/हरकती असल्यास सदर बाबतीत संस्थेच्या सभासदांनी विकासकाविरुध्द मा.सक्षम न्यायालयाकडे दाद मागणे अपेक्षित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) येथील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या आश्रमशाळांतील फळांचा पुरवठा बंद करण्यात आल्याबाबत

**(११) * १००१५३ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांतील एकूण १७ हजार ५५६ विद्यार्थ्यांना दररोज सकाळी दिला जाणारा केळी, सफरचंद, मोसंबी आणि अंडी हा सकस आहार आदिवासी विकास विभागाकडून माहे सप्टेंबर, २०१७ पासून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले  व सदर सकस आहार बंद करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त आश्रमशाळेतील निवासी मुलांना मिळणारा सकस आहार नियमित मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दि.१५.०६.२०१७ नुसार ऋतुमानानुसार फळांऐवजी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना २५० मि.लि. दूध पुरवठा करावयाचा असल्याने प्रकल्प अधिकारी, जव्हार (जि.पालघर) यांचेकडून आश्रमशाळांमध्ये दुध पुरवठयाबाबत ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना फळांऐवजी अंडी व केळी, मुग, वाटाणा, मटकी इत्यादी उसळींचा पौष्टीक आहार देण्यात येत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या रकमेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ९६५०५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.अनिल बोंडे**

**(मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या संदर्भात चौकशी करणाऱ्या चौकशी पथकाने (एसआयटी) सुमारे रु.२१७४ कोटी रुपयाच्या गैरव्यवहार प्रकरणी ६४ शैक्षणिक संस्थांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, सदर ६४ संस्थांची नावे काय आहेत तसेच त्यांनी प्रत्येकी किती रकमेचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, उक्त संस्थाचालकाकडून गैरव्यवहार केलेल्या रकमेपैकी आतापर्यंत प्रत्येकी किती रक्कम वसूल करण्यात आली आहे व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे,

(४) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी एसआयटीने केलेली चौकशी मान्य नसल्याने अहवालाच्या आधारे पुन्हा स्वतंत्र चौकशी करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार सामाजिक न्याय विभागाने पुन्हा चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) विशेष चौकशी पथकाने आदिवासी विकास विभागाकडील २ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील ६८ अशा एकूण ७० संस्थांनी एकूण रु.२८.३० कोटी रक्कमेची अनियमितता गैरव्यवहार केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यास कळविले असून, त्याची यादी पुढीलप्रमाणे आहे.

त्यानुसार पुढील कारवाई करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत संबंधित जिल्हयांच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना कळविण्यात आले आहे. तथापि, संबंधित संस्थांनी दाखल केलेल्या रिट याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपीठाने दिलेल्या स्थगिती आदेशानुसार संबंधित संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले

नाहीत. मात्र, शैक्षणिक संस्थाकडून वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही संबंधित सहायक आयुक्तांमार्फत सुरु आहे.

विशेष चौकशी पथकाच्या अहवालातील एकुण १७०४ संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने विश्लेषण व पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्यामार्फत सुरु असुन, अनियमिततेच्या रु.१८२६.८७ कोटी रक्कमेपैकी आतापर्यंत रु.९६.१६ कोटी इतकी वसुलपात्र रक्कम संस्थाकडून वसूल करुन कोषागारात भरणा करण्यात आली आहे. रु.६८५.४१ कोटी इतक्या अग्रिम रक्कमेचे समायोजन करण्यात आलेले असून, उर्वरीत वसुलपात्र रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) नाही,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विशेष चौकशी पथकाने गुन्हे दाखल करण्यासंबधात शासनास सादर केलेल्या शैक्षणिक संस्थांचा तपशिल

| अ.क्र | संस्था/महाविद्यालयाचे नाव | अनियमितता/गैरव्यवहार झालेली एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | स्वामी विवेकानंद महाविद्यालय जळकोट रोड, उदगीर, जिल्हा लातूर | ५८५४०७४ |
| २ | धन्वंतरी आयुर्वेदिक मेडीकल कॉलेज, उदगीर, जिल्हा लातूर | ३८९०५१६ |
| ३ | मॉर्डन कॉलेज ऑफ कॉम्प्यूटर सायन्स इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी, विद्युतनगर, जिल्हा नांदेड | ७८८६६९६ |
| ४ | सावित्रीबाई फुले विज्ञान व बीसीए महाविद्यालय पंचशिल नगर, वसमत जिल्हा हिंगोली. | २७५२३७२ |
| ५ | अनाथ वृध्द आनंद आश्रम संस्था, धुळे संचलित निर्मल कॉलेज, खेड रिगर तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार | १४२५८५०० |
| ६ | ॲनिमा ॲनिमेशन अकॅडमी धडगाव जिल्हा नंदूरबार | २०२२५४० |

| | | |
|---|---|---|
| ७ | सिस्टेल कॉम्प्युटर सेंटर नवापूर, जिल्हा नंदूरबार | ७०१७५५ |
| ८ | एमआयटी कॉलेज ऑफ आयटी ॲण्ड मॅनेजमेंट, नंदुरबार | १४०६०१० |
| ९ | जागृता तांत्रिक महाविद्यालय जिल्हा नंदुरबार | ५०२४१८३ |
| १० | अनाथ व्हयु ॲनिमेशन अकॅडमी जिल्हा नंदुरबार | २०७४२४० |
| ११ | संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई रोड, लातूर | १०४९७२५६ |
| १२ | राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निक, किनवट, जि.नांदेड | ७०६७९५९ |
| १३ | स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, बाळंतवाडी, ता.कंधार. जि.नांदेड | ८५०४३०० |
| १४ | राजश्री शाहू तंत्रनिकेतन विद्यालय कळंब, जि.उस्मानाबाद | ३८०९६१८८ |
| १५ | व्हि. जे. शिंदे तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय, वरूडा रोड, जि. उस्मानाबाद | ७३५२९३४ |
| १६ | महात्मा गांधी संगणक व तंत्र शिक्षण कॉलेज, घुग्गूस, जि.चंद्रपूर | २६०६५८० |
| १७ | स्वामी विवेकानंद इन्स्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, चंद्रपूर | ६५४८२२५ |
| १८ | ग्लोबस कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेंजमेंट, चंद्रपूर | ११९१५८५ |
| १९ | पूजा नर्सिग स्कुल, ता.परळी, जि.बीड | ६७८३९५ |
| २० | स्व. इंदिरा गांधी नर्सिंग स्कुल, ता.पाटोदा, जि.बीड | २७२२१५ |
| २१ | डॉ. डी. एम. धोंडे स्कुल ऑफ नर्सिंग. कडा, ता. अष्टी, जि.बीड | २२१३४६ |

| | | |
|---|---|---|
| २२ | जिजामाता नर्सिग स्कुल, ता. माजलगांव, जि.बीड | २८०१६० |
| २३ | कै. रघुनाथरावजी केंद्रे नर्सिंग स्कुल परळी, वैजनाथ, जि.बीड | ६९९२५ |
| २४ | कै. रघुनाथरावजी केंद्रे नर्सिंग स्कुल परळी, वैजनाथ, जि.बीड | ८०००० |
| २५ | यशवंत नर्सिग स्कुल, ता.अष्टी. जि.बीड | ११०६५६३ |
| २६ | लोकसेवा नर्सिंग स्कुल, जि.बीड | ३३१८२५ |
| २७ | अंकिता दौंड इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग आंबेजोगाई, जि.बीड | ३९४३५ |
| २८ | ज्ञानदीप कॉलेज आयटीआय मॅनेंजमेंट ता. अंबाजोगाई, बीड | १९५९५५ |
| २९ | किसान कॉलेज ऑफ आयटीआय अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर, ता.धारूर, जि.बीड | १४८८३६८ |
| ३० | माणिकदादा कदम-पाटील, संगणक व व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | २३११०२३ |
| ३१ | सहारा इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग स्कुल अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | १९०६२२०९ |
| ३२ | धन्वंतरी इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग स्कुल, अकलुज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | ७८९२२९९ |
| ३३ | करिअर इन्स्टीटयुट ऑफ कम्प्युटर अ‍ॅण्ड आयटी, मादळमोही, ता.गेवराई, जि.बीड | ५३८०४४० |
| ३४ | अ‍ॅस्पायर कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी C/O एस. पी. कॉलेज, चंद्रपूर | २२०८३३५ |
| ३५ | छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ टेक्निकल, बाबूपेठ, चंद्रपूर | ३४६०६५ |

| | | |
|---|---|---|
| ३६ | एफ. झेङ कॉलेज ऑफ कम्प्युटर सायन्स अॅण्ड मॅनेजमेंट, मूल, चंद्रपूर | १३२८४० |
| ३७ | गुरूसाई कॉलेज, विराई रोड, मूल, जि.चंद्रपूर | ६४४०६१० |
| ३८ | चिमुर सायन्स अॅण्ड कॉमर्स कॅालेज, चिमुर, जि.चंद्रपूर | १५९१७३५ |
| ३९ | पिंपरी नर्सिंग स्कुल, चिंचवड, पुणे | ११४१३०३ |
| ४० | बकुळ तांबट इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग कर्वे, नगर, पुणे | १०९८२०७ |
| ४१ | अश्विनी इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग सोलापूर | ८१२९५६० |
| ४२ | श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ कॉलेज ऑफ नर्सिंग, बार्शी, सोलापूर | ४४७२९२७ |
| ४३ | गोंडवाना कॉलेज ऑफ टेक्निकल दाताळा, चंद्रपूर | २१५०६७५ |
| ४४ | मूल कम्प्युटर कॉलेज, मूल, चंद्रपूर | ६५५५७० |
| ४५ | सावली कम्प्यूटर कॉलेज, ता.जि.चंद्रपूर | ० |
| ४६ | स्वामी विवेकानंद इन्स्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, गडचांदुर, जि.चंद्रपूर | ५२९७८५ |
| ४७ | राधेय कॉलेज ऑफ टेक्निकल एज्यूकेशन एचएमसीटी, बुलढाणा | १३०७३७६ |
| ४८ | राधेय कॉलेज ऑफ मॅनेजमेंट कॅटरींग टेक्नॉलॉजी, बुलढाणा | १८२०९८८ |
| ४९ | श्री.सिध्देश्वर इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग होटगी रोड, सोलापूर | ७१२९२५ |
| ५० | बिनीत मेडीकल फाऊंडेशन संचलित बिनीत नर्सिंग इन्स्टिटयुट, सोलापूर | १८१६८६६ |
| ५१ | वसंत दादा काळे मेडीकल फाऊंडेशन संचालित जनकल्यानइन्स्टि.ऑफ नर्सिंग एज्युकेशन पंढरपूर, जि.सोलापूर | १७३८७४५ |

| | | |
|---|---|---|
| ५२ | धनश्री इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग स्कुल कुर्डुवाडी, जि.सोलापूर | ३००४२५ |
| ५३ | फेरी लॅड पॉलिटेक्निक कॉलेज, चंद्रपूर | २९११९३६० |
| ५४ | महात्मा गांधी कॉलेज, चिमुर, जि.चंद्रपूर | ४८२०९४० |
| ५५ | मल्लीकार्जुन हेल्थ केअर रिसर्च सेंटर यशोधरा नर्सिंग इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग सोलापूर | ४२८४२५४ |
| ५६ | धनराजगिरी इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग स्कुल, पार्कचौक, सोलापूर | १०७१७२८७ |
| ५७ | एस. पी इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग स्कुल, सोलापूर | १९०३६६४ |
| ५८ | मार्कडेय सोलापूर सहकारी रूग्णालय नर्सिंग ट्रेनिंग स्कुल, पच्चापोठ सोलापूर | १८१९८५३ |
| ५९ | श्रीमती कमलाबेन पटेल इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग एज्यूकेशन, कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर | २५९७४७५ |
| ६० | विजयसिंग मोहिते- पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, अकलुज, जि.सोलापूर | ४३०५९४५ |
| ६१ | सरदारबी इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग स्कुल, व्हि. एस कॅम्पस, सीमोलघ्घन पाद रोड, मोहोळ, जि.सोलापूर | ४९५५३६५ |
| ६२ | राजमाता जिजाऊ नर्सिंग स्कुल पंढरपूर, जि.सोलापूर | ७५१६०२२ |
| ६३ | भक्ती इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग ता.पंढरपूर, जि.सोलापूर | ४७४७७१० |
| ६४ | चंद्रकांत यशवंत दांगट पाटील शिक्षण व क्रिडा मंडळाचे इन्स्टी. ऑफ नर्सिंग, वडगांव बुद्रुक, ता.हवेली जि.पुणे | ४४५२० |

| | | |
|---|---|---|
| ६५ | कै. राजाराम तुकाराम भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठान संचलित, गिरीराज नर्सिंग स्कुल, बारामती, जि.पुणे | ११९२४ |
| ६६ | ग्रँट मेडीकल फाऊंडेशन, रूबी हॉल क्लिनीक, तेहमी ग्रँट इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग, पुणे स्टेशन जि.पुणे | ८६३५२ |
| ६७ | यश चॅरिटेबल फाऊंडेशन इंदापूर संचालित, यश स्कुल ऑफ नर्सिंग इंदापूर, जि.पुणे | २३७०० |
| ६८ | ऋषी बहुउद्देशीय व शैक्षणिक विकास संस्था, संचालित, जय इन्स्टी. ऑफ नर्सिंग, दत्तनगर, इंदापूर, जि.पुणे | २२६१८५ |
| ६९ | भालचंद्र स्कुल ऑफ नर्सिंग, गोऱ्हे खुर्द, सिंहगड रोड, शिकागो हिल्स पानशेत रोड, जि.पुणे | २०१३१५५ |
| ७० | कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर, फाऊंडेशन, इन्स्टीटयुट ऑफ नर्सिंग, इंद्रप्रस्त, वडगाव, बुद्रुक जि.पुणे | १२१८४९ |
| | **एकूण** | **२८३०५६५६८** |

-----------------

## दाभाडी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत

**(१३) * १०००३६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभाडी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील ७६ विद्यार्थ्यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास अन्न पदार्थातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व यात दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व भोजन पुरविणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. हे खरे आहे.
(२) प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांनी शाळेवर भेट देऊन शाळेची पाहणी केली. सदर दिवशी केलेल्या जेवणाच्या अन्न धान्याचे नमुने व पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर, भिवंडी व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना भेसळयुक्त दुध देण्यात येत असल्याबाबत

**(१४) * ९५३२२ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना आय.एस.ओ. नामांकन असलेल्या कंपन्यांकडून सीलबंद (टेट्रा पॅक) दूध वाटप करण्याबाबत शासनाचे आदेश असताना ठाणे जिल्हयातील शहापूर, भिवंडी व मुरबाड तालुक्यातील २३ आश्रमशाळांतील ८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना गत तीन महिन्यांपासून २०० मिलीलीटर पेक्षाही कमी व पाणी मिश्रित सुटे भेसळयुक्त दुध देण्यात येत असल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याध्यापक व अधिक्षक यांनी बाजारातील सुटे दूध गुणवत्ता न तपासता दिले असून याकरिता निविदा न काढता मर्जीतील ठेकेदारांकडून गेले अनेक महिने दूध खरेदी करुन त्यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना सीलबंद दूध देण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शहापूर (जि.ठाणे) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या शहापूर, भिवंडी व मुरबाड तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना नामांकित ब्रॅन्डचे सीलबंद पिशवीत दुध पुरवठा सुरळीत सुरु आहे. कोणत्याही आश्रमशाळेत सुटया दुधाचा पुरवठा केला जात नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती-जमाती व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत मिळण्याबाबत

**(१५) * ९५७१० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खासगी व स्वायत्त विद्यापीठांच्या महाविद्यालयांमधील अनुसूचित जाती-जमाती व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत व आरक्षणाचा लाभ मिळत नसल्याने या विद्यापीठामधील विद्यार्थ्यांना

शुल्क प्रतिपूर्ती देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय.
(२) खाजगी/स्वयं अर्थ सहाय्यीत विद्यापीठात अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्ती मिळण्याबाबत लोकप्रतिनिधींच्या मागणी संदर्भांत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने, त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सदरील निवेदने त्या विभागाकडे पाठविण्यात आलेली आहेत.
(३) व (४) या संदर्भांत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## रायगड जिल्हयात आदिवासी विकास महामंडळातर्फे भात खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(१६) * ९५७७४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पनवेल, कर्जत, खालापूर, पाली, अलिबाग, रोहा, मुरुड या तालुक्यांत आदिवासी विकास महामंडळातर्फे शासनमान्य हमी भाव देणारी भात खरेदी केंद्रे तातडीने सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यांत पणन अधिकाऱ्यांकडून भात खरेदी केंद्र वेळेवर सुरू होत नसल्याने आदिवासी शेतकऱ्यांना कमी भावात व्यापाऱ्यांना भात विकावा लागत असून त्यामुळे आदिवासींचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने जाहीर केलेल्या रू.१५५० प्रति क्विंटल या भावाने भात खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
रायगड जिल्हयातील कर्जत तालुका आदिवासी उपयोजना क्षेत्रात येतो. कर्जत तालुक्यात खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कशेळे व खांडस या संस्थामार्फत हंगाम २०१७-१८ साठी कशेळे व पाथरज येथे खरेदी केंद्र सुरु करणेसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २४.१०.२०१७ चे पत्रान्वये मंजुरी दिली आहे.
(३) कर्जत तालुक्यात दोन ठिकाणी दि.२८.११.२०१७ रोजी पासून मंजुर खरेदी केंद्र चालू झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांतील अपूर्ण कामांबाबत

**(१७) * ९७११५ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय शहापूर अंतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांतील मुला-मुलींच्या वसतीगृहाच्या इमारती, सभोवतालच्या संरक्षण भिंती व पिण्याच्या पाण्याच्या टाक्या इत्यादींची कामे अनेक वर्षांपासून

अपूर्ण असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शहापूर (जि.ठाणे) येथे क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी असून ५०० विद्यार्थी क्षमतेचे नविन वसतिगृह बांधण्याची मागणी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत तसेच नवीन वसतीगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत २३ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी १४ शासकीय आश्रमशाळांसाठी नविन टाईप प्लॅन प्रमाणे शालेय इमारत संकुल बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यापैकी ठाणे जिल्हयातील आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत शिरोळ, डोळखांब, दहांगाव, शेणवा या आश्रमशाळांतील मुलां-मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून सदर इमारती विद्यार्थ्यांच्या वापरात आहेत. तसेच वसतिगृह सभोवतालच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम व पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम झालेले आहे. सद्य:स्थितीत शासकीय आश्रमशाळा टाकीपटार, पिवळी, अघई, पेंढरघोळ व मोरोशी येथील मुलां-मुलींची वसतिगृह इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून, इतर बांधकामे पूर्णत्वास नेण्याबाबत कार्यवाही करण्यांत येत आहे.
(२) शहापूर तालुक्यातील शहापूर येथे ५०० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.
(३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.१४.०७.२०१६ अन्वये शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहे इमारत बांधकामासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्षाची स्थापन करण्यांत आलेली आहे. त्यानुसार शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहे यांचे इमारत बांधकाम होण्याच्या दृष्टिने बांधकाम व्यवस्थापन कक्षाकडून कार्यवाही करण्यांत येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरात महावितरण कंपनीने प्रत्यक्ष मीटरचे वाचन न घेता ग्राहकांना चुकीची देयके दिल्याबाबत

**(१८) * ९९४८४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात महावितरण कंपनीने प्रत्यक्ष मीटरचे वाचन न घेता ग्राहकांना चुकीची देयके दिल्याच्या अनेक तक्रारी वीज वितरण कंपनीकडे प्राप्त झाल्या असून वीज देयक प्रणालीच्या २०७११ आणि २०७१२ लॅटीट्युड आणि लॉजिट्युड मधील सर्व्हरमध्ये हस्तक्षेप केल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच दिवशी सुमारे ६०० ग्राहकांचे मीटर वाचन घेण्यात आले असून सदर प्रकरणी विद्युत वितरण कंपनीने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीमध्ये काय निदर्शनास आले, त्यानुसार संबधितांवर कारवाई व चुकीची देयके दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) याप्रकरणी महावितरण कंपनीकडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये असे आढळून आले की, संबंधित संगणक प्रणालीमध्ये कोणताही हस्तक्षेप झालेला नाही. एकाच युजर ID चा (ravi ४५७०) वापर करुन तीन वेगवेगळया मोबाईल धारकांकडून सुमारे ६६१ वीज ग्राहकांचे मिटर वाचन दिनांक १४.०९.२०१७ रोजी घेण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकवासला व परिसरात (जि.पुणे) महावितरणचे विद्युत रोहित्र धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(१९) * ९५१८२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला, धनकवडी, बालाजीनगर, बिबवेवाडी, वडगाव, किरकीटवाडी, कोथरूड, वारजे, बावधन, भुसारी कॉलनी (जि.पुणे) या भागात महावितरणचे विद्युत रोहित्र धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्राभोवती सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कुंपण वा जाळ्या नसणे, बहुतांश रोहित्र रहिवाशी संस्था व रहदारीच्या रस्त्यांमध्ये असणे, रोहित्राभोवती लहान मुलांचा वावर असणे, यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन संबंधित महावितरण कार्यालयाकडे लेखी पत्रव्यवहार, पाठपुरावा करुनही याबाबत कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर भागात रामबाग कॉलनी, खडकवासला येथील रोहित्राला अतिरिक्त सुरक्षा देण्याची बाब निदर्शनास आल्यानंतर तेथे जाळीच्या कुंपणाचे काम दिनांक २२.११.२०१७ रोजी महावितरण कंपनीमार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

(२) व (३) आवश्यक त्या सर्व धोकादायक ठिकाणी रोहित्र व आजूबाजूची जागा सुरक्षित करण्यासाठी जाळी, कुंपण व पत्र्याचे आच्छादन या उपाययोजना महावितरण कंपनीमार्फत केल्या जातात. तसेच असे विद्युत रोहित्र निदर्शनास आल्यास त्यांना सुरक्षित करण्याचे काम ताबडतोब हाती घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शबरी आदिवासी वित्त व आदिवासी विकास महामंडळाकडून कर्ज मंजूरीबाबत झालेली फसवणूक

**(२०) * ९५९०६ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील**

**(धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शबरी आदिवासी वित्त व आदिवासी विकास महामंडळाकडून कर्ज मंजूरीबाबत झालेल्या फसवणूक प्रकरणाची व्याप्ती वाढली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अहमदनगर जिल्हयातील तोफखाना पोलिस ठाणे येथे फसवणूक झालेल्या २२ जणांनी तक्रार केली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार फसवणूक करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच फसवणूक झालेल्या कर्जदारांचे पैसे परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे, सदरबाबत तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे आतापर्यंत फिर्यादी व साक्षीदार अशी एकुण ८ लोकांची तक्रार प्राप्त झालेली आहे.

(३) सदरबाबत तोफखाना पोलीस स्टेशन अहमदनगर गु.र.नं ४१९/१६ भादवि ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दि.२६.१२.२०१६ रोजी १७.०५ वा. गुन्हा दाखल झाला असुन सदर गुन्हयात दोन आरोपीनां अनुक्रमे दि.१८.०७.२०१७ व दि. २३.०८.२०१७ रोजी अटक केलेली आहे. सदर गुन्हयातील फसवणूकीव्दारे घेतलेली रक्कम पोलीस तपासाव्दारे हस्तगत झाल्यानंतर कर्जदारांचे पैसे त्यांना परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) सदरबाबत विलंब झालेला नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गेल्या तीन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत

**(२१) * ९५०२४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आदिवासी विकास व समाजकल्याण विभागाकडून गत तीन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला निवेदन देऊनही शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नसल्याने विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढून दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित असणे, पुरेसा निधी उपलब्ध नसणे तसेच ऑनलाईन संगणकीय प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड इत्यादी कारणांमुळे काही शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित होते.

(२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्रलंबित अर्ज संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे सादर करण्याबाबत सर्व महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय विभाग तसेच आदिवासी विकास विभागाकडून ऑनलाईन संगणक प्रणाली सुरू करण्यात आली असून सदर प्रणालीमार्फत पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या कामांचे कंत्राट कंपन्यांना निविदा न काढता देण्यात आल्याबाबत

**(२२) * ९७९६६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी दलित विद्यार्थ्यांची वसतिगृहे, निवासी शाळा आणि सामाजिक न्याय भवन यांची साफसफाई, माळीकाम, सुरक्षा आणि वीज देखभाल यांचे सुमारे १०० कोटीहून अधिक रुपयांचे कंत्राट कोणतीही निविदा न काढता दोन कंपन्यांना देण्यात आले असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) त्याचप्रमाणे दिनांक १० मार्च, २०१६ रोजी सामाजिक न्याय मंत्री यांनी मुंबईच्या बीडीडी चाळीत असलेल्या शासकीय वसतीगृहास भेट दिल्यानंतर तेथील गैरव्यवस्थेला जबाबदार असलेल्या कंपनीच्या कामांबद्दल १५ ते १६ आक्षेप घेणारे तसेच या कंपनीला काळया यादीत टाकण्याबाबत सुचना करणारे लेखी पत्र तत्कालीन प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(३) तसेच या कंपनीचे काम समाधानकारक नसल्याबाबत संबंधित खात्याकडे अनेकांनी लेखी तक्रारी करुनही, त्याच कंपनीला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सन २०१३ च्या सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयामध्ये काम असमाधानकारक असल्यास पुन्हा काम देण्यात येऊ नये असा उल्लेख असतानांही विभागाच्या मंत्र्यांनी सचिवांकडे लेखी तक्रार करुनही व या कंपन्यांची मुदत माहे सप्टेंबर २०१६ मध्ये संपत असतांनाही माहे एप्रिल, २०१७ पर्यंत या कंपन्यांचे काम तसेच चालु ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या नियमबाह्य कंत्राटाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) होय.

शासकीय वसतीगृह, निवासी शाळा तसेच सामाजिक न्याय भवन येथे साफसफाई व इतर कामे बाहयस्त्रोताकडील मनुष्यबळाद्वारे पुरविण्याचे ई-निविदेद्वारे देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशाची मुदत संपुष्टात आल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून नविन कंत्राटाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत करारातील अटीनुसार पूर्वीच्या कंत्राटदाराकडून काम चालू ठेवण्यात आलेले आहे.

वरळी, मुंबई येथील वसतीगृहातील असमाधानकारक कामासंदर्भात तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील उमा नदीवर व बोकरडोह नाल्यावर पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२३) * ९५२२४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठगाव-राजोली-तांबेगडी-मेंढा रस्त्यावरील (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) प्रजिमा २६ वर किमी २/०५० मध्ये उमा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी आणि सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी माहे मार्च, २०१६ मधील अर्थसंकल्पात आदिवासी विभागाने निधीसह मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी १० कोटी रूपये निधीची आवश्यकता असताना आदिवासी विभागाने फक्त १० लक्ष रूपये आणि बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी ७ कोटी ५० लक्ष रूपये निधीची आवश्यकता असतांना आदिवासी विभागाने फक्त ७ लक्ष ५० रूपयास मंजूरीदिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दोन्ही ठिकाणी मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी अर्थसंकल्पिय तरतुदीत सुधारणा करून मान्यता दयावी असे निर्देश मा.आदिवासी मंत्री यांनी संबधित विभागास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पुलांच्या बाधकामांकरिता निधी वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाच्या बांधकामास दि.१५.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,चंद्रपूर यांनी शिफारस केल्यानुसार रु.७.५० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामाचा समावेश विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज २०१६-१७ भाग तीन मधील परिशिष्ट ड मध्ये करण्यात आलेला आहे.

पेठगाव राजोली तांबेगडी मेंढा रस्त्यावरील (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) प्रजिमा २६ वर किमी २/०५० मध्ये उमा नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकामास विभागाद्वारा राज्यस्तरावरून मंजूरी देण्यात आलेली नसून सदर कामाच्या अंदाजित रु.१०.०० कोटी किंमतीच्या बांधकामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) व (४) आदिवासी उपयोजनेंतर्गत रस्ते व पुलांच्या सुरु असलेल्या व नवीन हाती घेतलेल्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर दायित्व प्रलंबित असल्याने सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकामासाठी निधी वाढवून देणे शक्य नसल्याबाबत लोकप्रतिनिधींना दि.२६/०४/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

पेठगाव राजोली तांबेगडी मेंढा रस्त्यावरील (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) प्रजिमा २६ वर किमी २/०५० मध्ये उमा नदीवरील मोठया पुलाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२४) * ९६२७४ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करणाऱ्या विभागीय जात वैधता दक्षता पथकांकडे पुरेसे कर्मचारी नसल्याने आदिवासींची सुमारे १५ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: जळगांव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या नंदूरबार येथील कार्यालयातील सहआयुक्त या महत्वाच्या पदासह १७ कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याने ६ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर भार पडत असल्यामुळे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असून सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नाही.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील दक्षता पथकांकडे एकूण ९८९८ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) अंशत: खरे आहे. सहआयुक्त पद भरण्यात आले असून सद्यस्थिती १६ पदे रिक्त आहेत. उपसंचालक (संशोधन) व विधी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेला आहे. नंदुरबार समिती कार्यालयाकडे ६५९१ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) व (४) वर्ग-१ ची ४ पदे रिक्त आहेत. त्यातील पोलीस उपअधिक्षक पदांवर अधिकारी देण्यासाठी गृह विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. विधी अधिकारी पद भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी करण्यात आली असून उपसंचालक (संशोधन) व वरिष्ठ संशोधन अधिकारी पदांसाठी पदोन्नतीची कार्यवाही सुरु आहे. वर्ग-२ च्या संशोधन अधिकारी या रिक्त पदावर सरळसेवेने एक कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहे. तसेच वर्ग-३ व ४ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील महावितरण कंपनीच्या कंत्राटी कामगारांचे मानधन थकीत असल्याबाबत

**(२५) * १००५२४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील महावितरण कंपनीच्या ३०२ कंत्राटी कामगारांचे गेल्या सहा महिन्यांपासून सुमारे १ कोटी ७५ लक्ष रुपयांचे मानधन थकीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत सहा महिन्यांपासून वेतन थकीत असल्याने कामगारांच्या दैनंदिन खर्चाचा प्रश्न निर्माण झाला असून कामगारांचे वेतन थकीत राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार कामगारांचे वेतन त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील कंत्राटी कामगारांचे माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत वेतन अदा करण्यात आले असून, माहे ऑक्टोबर, २०१७ चे वेतन अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) कंत्राटी कामगारांचे माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत वेतन अदा करण्यात आले असून, माहे ऑक्टोबर, २०१७ चे वेतन अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत कंत्राटी कामगारांचे वेतन अदा करण्यात आले असून माहे ऑक्टोबर, २०१७ चे देयक कंत्राटदाराने महावितरण कंपनीस दिनांक १०.११.२०१७ रोजी सादर केले आहे. त्यानुषंगाने माहे ऑक्टोबर, २०१७ चे वेतन अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि.०२.०५.२०१६ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांचे वेतन संबधित कंत्राटदाराने स्वत:च्या निधीतून करणे अपेक्षित असून त्याची प्रतिपूर्ती महावितरण कंपनीमार्फत केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहकारी संस्थांच्या उभारणीसाठी दिलेल्या भाग भांडवल व कर्जाची वसूली करण्याबाबत

**(२६) * ९५७१८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने काही सहकारी संस्थांच्या उभारणीसाठी दिलेले भाग भांडवल व शासकीय कर्ज वेळेत परत न करणाऱ्या संस्थांचे लेखापरिक्षण करणेबाबत मा.मुख्यमंत्री व मुख्य सचिवांनी संबंधित विभागास सुचना दिल्या असून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील सहकारी संस्थाकडे सुमारे ३८ कोटी ६८ लाख रुपयांचे येणे बाकी असल्याने आत्तापर्यंत केवळ ३९ लाख रुपयांची वसूली झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर महिन्याला या वसुलीचा आढावा घेऊन वसुलीकरीता धोरण अवलंबण्याचा निर्णय घेण्यात आला असतांना वसुलीबाबत दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर विभागांच्या तुलनेत कोल्हापूर विभागात सन २०१७-१८ मध्ये कोल्हापूर जिल्हयाला ६ कोटी ४७ लाख वसूल करण्याचे उद्दिष्ट देऊन आत्तापर्यंत फक्त १९ लाख रुपये वसूल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी त्वरित वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या वसुलीसाठी मार्च २०१८ पर्यंत वार्षिक उद्दिष्ट दिले असून या संदर्भात जिल्हास्तरावर आढावा बैठका घेऊन वसूलीचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) व (४) कोल्हापूर जिल्हयाला दिलेल्या उद्दिष्टापैकी माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर रू.२२.०६ लाख इतके वसूल करण्यात आले आहेत.

शासकीय वसूली संदर्भात तालुका निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था तसेच सहकारी आयुक्त, पुणे यांचेकडून शासकीय रकमा वसूल करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सहकार कायदयातील कलम १५५ अन्वये थकीत सहकारी संस्थांवर कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कोळी, आदिवासी व ठाकूर समाजासाठी जातीचे दाखले काढताना सन १९५० पूर्वीचे पूरावे सादर करण्याची अट शिथील करण्याबाबत

**(२७) * ९९३३९ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने कोळी, आदिवासी, ठाकूर समाजातील नागरिकांसाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे दाखले काढण्यासाठी सन १९५० पूर्वीचे पूरावे सादर करण्याची अट लागू केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयात मोठ्या प्रमाणात असलेल्या कोळी, आदिवासी, ठाकूर समाजास स्वातंत्र्यपूर्व काळापासून शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध

नसल्यामुळे या समाजाकडे कोणतेही दाखले तसेच शासन दरबारी तशी नोंद नसल्याने त्यांना सन १९५० पूर्वीचा पुरावा सादर करताना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातीचा दाखला नसल्याने शासनाच्या विविध योजनांपासून त्यांना वंचित राहावे लागत असून कोळी, आदिवासी, ठाकूर समाजाने सदर अट शिथील करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पुरावा सादर करण्याची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) संबंधित अधिनियमांतर्गत केलेल्या नियमांमधील नियम ३ (३) नुसार उमेदवाराने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. परंतु नियम ३(४) मधील तरतूदीनुसार अर्जदार दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अर्जदाराने त्याबाबतची कारणे नमुद करुन सक्षम अधिकाऱ्यास शपथपत्र सादर करावयाचे आहे. त्या शपथपत्रावर सक्षम प्राधिकाऱ्याने विचार करुन तसेच योग्य चौकशी करुन गुणावगुणांवरुन (on merit) दाव्याचा निर्णय घ्यावा, अशी तरतुद आहे.

परंतु सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ६.२.२०१० अन्वये अनुसूचित जाती या प्रवर्गातील व्यक्तींना दिनांक १०.८.१९५० रोजी व तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली. नियम, २०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.६०६०/२००८ कु.श्वेता शांतालाल लाल विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणात दिनांक १०.८.१९५० रोजी महाराष्ट्र राज्यात मूळ निवास नसलेली अनुसूचित जातीच्या व्यक्तीस अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या सवलतींचा लाभ घेता येणार नाही, त्या व्यक्तीस त्याच्या मूळ राज्यात अशा सवलतींचा लाभ मिळेल असा महत्त्वपूर्ण निकाली दिला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला (जि.अकोला) येथील पीएच मार्केटसमोरील आदिवासी वसतिगृहाची झालेली दुरवस्था

**(२८) * ९८८२९ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागांतर्गत चालविण्यात येत असलेल्या अकोला (जि.अकोला) येथील पीएच मार्केटसमोरील आदिवासी वसतिगृहाच्या दुरवस्थेबाबत प्रकल्प अधिकारी, अकोला व वॉर्डन यांच्यावर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या पहाणीत शौचालयाच्या ठिकाणी स्वयंपाकगृह, बाजूला भरुन ठेवलेले कचऱ्याचे ड्रम, विद्यार्थ्यांना उघडयावर अंघोळ करावी लागणे, झोपण्यासाठी पलंग नसणे इ. गैरसोयी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहू वसतिगृहाच्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) मा.लोकप्रतिनिधींकडून अशा प्रकारची मागणी केल्याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) स्वयंपाकगृहाच्या शेजारी असलेले शौचालय हे वापरात नाही. तेथे ओटा करण्यात आला असून याठिकाणचा वापर स्वयंपाकाची भांडी घासण्याकरिता करण्यात येतो.

सदर आवारामध्ये ठेवण्यात येत असलेल्या डस्टबीन (कचऱ्याचे ड्रम) हे कॉरीडॉरमध्ये हलविण्यात आलेले असून सदर ड्रम दररोज महानगरपालिकेच्या कचरा गाडीमध्ये खाली करण्यात येतात. सदर वसतीगृहात एकूण ६ शौचालये व ६ स्नानगृहे आहेत. सद्यस्थितीत विद्यार्थी अंघोळीसाठी स्नानगृहे वापरतात. गृहपालाने वसतीगृहाच्या स्वच्छतेसाठी रोजंदारीवर सफाईगाराची नेमणूक केली आहे.

मा.लोकप्रतिनिधींच्या वसतीगृह भेटीनंतर प्रस्तुत प्रकरणी संबंधित गृहपाल यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरूद्ध अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती कार्यालयामार्फत विभागीय चौकशीची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबत

**(२९) * ९७६४४ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धैर्यशील पाटील (पेण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मॅट्रिकपूर्व ७० ते ७५ लाख आणि मॅट्रिकोत्तर २५ ते ३० लाख विद्यार्थी शासनाच्या शिष्यवृत्तीशी निगडीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मागील वर्षी अनुसूचित जाती,

विमुक्त जाती भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ११ लाख अर्जांपैकी तीन लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय, आदिवासी, अल्पसंख्यांक विकास, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, कृषि, वैद्यकीय शिक्षण इत्यादी विभागांमार्फत जवळपास ५५ लाख विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा होते, परंतु ऑक्टोबर महिनाअखेर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यासाठी महा डीटीबी पोर्टल सेवा सुरु करण्यात आली असून त्या सेवेमार्फत अद्यापही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन मागील आणि चालु वर्षाची शिष्यवृत्ती ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना त्वरित प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे, डिबीटी पोर्टल वर येणाऱ्या अडचणीमुळे डिबीटी पोर्टल ऐवजी पहिल्या सत्राचा शिष्यवृत्तीचा लाभ पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे आहे.
(४) मागील आणि चालू वर्षाची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना आधार संलग्नित बँक खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) आधार संलग्न बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## वांजरी पोड, वाघोली व अकोलाबाजार (जि.यवतमाळ) येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेच्या कामकाजात झालेली अनियमितता

**(३०) * १०१०२० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा महाकाली आदिवासी विकास संस्थेव्दारा चालविण्यात येणाऱ्या वांजरी पोड, वाघोली व अकोलाबाजार (जि.यवतमाळ) येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळांची तपासणी पथकाने केली असता या तिन्ही आश्रमशाळेच्या कामकाजात अनियमितता व अनेक आक्षेपार्ह बाबी असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पथकाने तपासणी केली असता इतर जमातीचे विद्यार्थी दाखवुन आश्रमशाळेच्या अनुदानात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित आश्रमशाळेच्या प्रशासनाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) इतर जमातीचे विद्यार्थी दाखवुन आश्रमशाळेच्या अनुदानात गैरव्यवहार केल्याचे तपासणीत निदर्शनास आले नाही.

(३) तपासणी पथकाने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी त्यांच्या दि.३०.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर तिनही आश्रमशाळा रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सादर केला आहे. त्यानुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मान्यता रद्द करण्यात आलेल्या शेल कंपन्यांबाबत

**(३१) * ९६२४१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मान्यता रद्द करण्यात आलेल्या शेल कंपन्यांच्या मालमत्ता शोधण्याचा आदेश शासनाला मिळाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेल कंपन्यांच्या मालमत्तेची विक्री व इतर आर्थिक व्यवहार न करण्याबाबत विशेष खबरदारी घ्यावी, असे आदेश केंद्र शासनाने राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मान्यता रद्द केलेल्या एकूण किती शेल कंपन्या आहेत,
(४) तसेच, मान्यता रद्द करण्यात आलेल्या शेल कंपन्यांबाबत केंद्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या कॉर्पोरेट कार्यालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ व १३ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये रजिस्ट्रार ऑफ कंपनीज कार्यालयाकडून केंद्र शासनास प्राप्त झालेली कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २४८(५) अन्वये बंद (struck off) कंपन्यांची यादी राज्य शासनास पाठविली आहे.

या बंद कंपन्यांची महाराष्ट्र राज्यातील अचल मालमत्ता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी शोधून ताब्यात घ्याव्यात व कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २५२ अन्वये या बंद कंपन्या पूर्न:स्थापित करण्याचे आदेश केंद्र शासनाकडून प्राप्त होईपर्यंत, या मालमत्तांची विक्री, हस्तांतरण, इ. करण्यात येऊ नये अशा सूचना केंद्र शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यातील ६०१०५ बंद कंपन्या आहेत.
(४) उद्योग विभागाच्या दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (महसूल व वन विभाग) तसेच नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, सर्व विभागीय आयुक्त यांना केंद्र सरकारच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

-----------------

## वाशिम जिल्हयात बचत गटांना यादीत नसलेल्या कंपन्यांचे ट्रॅक्टर व उपसाधनांचे वाटप केल्याबाबत

**(३२) * ९९४४२ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात समाज कल्याण विभागामार्फत बचत गटांना यादीत नसलेल्या कंपन्यांचे ट्रॅक्टर व उपसाधनांची खरेदी करुन वाटप केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उर्वरित ट्रॅक्टर व उपसाधने खरेदी करुन पूर्ण क्षमतेने बचत गटांना वाटप करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) निर्धारीत केलेल्या प्रमाणकानुसार मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी कागदपत्रे सादर केलेल्या ३७ बचत गटांच्या खात्यावर शासकीय अनुदानाच्या ५०% चा पहिला हप्ता जमा करण्यात आलेला असून यापैकी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणी झालेल्या ११ बचत गटांच्या खात्यावर शासकीय अनुदानाच्या ५०% चा उर्वरीत दुसरा हप्ता जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत बचत गटांची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून नोंदणी झाल्याची कागदपत्रे प्राप्त होताच सदर बचत गटांच्या खात्यावर उर्वरीत हप्ता जमा करुन वाटपाची कार्यवाही पूर्ण होणार आहे.

-----------------

## पुणे शहरातील वडगाव-शेरी भागातील नागरिकांना महावितरणकडून जादा रकमेची देयके येत असल्याबाबत

**(३३) * ९९९२७ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील वडगाव-शेरी भागात महावितरणामार्फत व्यावसायिक व घरगुती स्वरुपाची देयके प्रचलित नियमापेक्षा वाढीव रक्कम नमूद करुन दिली जात असून रिंडिंग घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराने चुकीच्या पध्दतीने रिंडिंग घेतल्याने संबंधित वीज ग्राहकाला जादा देयके येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे ऑगस्ट, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या भागात महावितरणकडून इन्फ्रा-२ योजनेतंर्गत सुरु असलेले काम कंत्राटदाराकडून नियमाप्रमाणे होत नसल्याने संबंधित कंत्राटदार शासनाची फसवणूक करत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारींची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित कंत्राटदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ऑगस्ट, २०१७ मध्ये वडगांव शेरी उपविभागांतर्गत एकूण ७२,३८५ ग्राहकांपैकी १७१ ग्राहकांच्या बिलासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) ऑगस्ट, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात एकूण १७१ ग्राहकांचे चुकीचे रिडींग घेतल्याबाबत महावितरण कंपनीकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या ग्राहकांची वीज बिल दुरुस्ती करण्यात आली असून, संबंधित रिडींग घेणाऱ्या कंत्राटदारावर कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार रु. ७,७५०/- दंड आकारण्यात आलेला आहे व यापुढे अशा प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी कंत्राटदारास सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) येथील आदिवासी विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करताना झालेला गैरव्यवहार

**(३४) * ९५९५४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) येथील आदिवासी विकास विभागामार्फत सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात आदिवासी विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करताना आर्थिक गैरव्यवहार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, चौकशी समितीने अहवाल सादर केला आहे काय, सादर केलेल्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थी रेनकोटपासून वंचित राहू नयेत व वाटपात गैरव्यवहार होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी भ्रष्टाचार निर्मूलन समिती, नाशिक यांचेकडे वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अपर आयुक्त, नाशिक यांना सूचित केले. त्यानुसार अपर आयुक्त, नाशिक यांचे स्तरावरुन चार सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली.
(३), (४) व (५) सदर समितीने प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात नमूद बाबीसंदर्भात प्रकल्प अधिकाऱ्यांचा खुलासा घेण्यात आला आहे. सदर खुलासा तपासून आवश्यकता भासल्यास वरिष्ठ स्तरावरुन सखोल चौकशी करण्याबाबत समितीने सूचित केले आहे. सन २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांना विविध वैयक्तिक वापराच्या वस्तू खरेदीसाठी थेट निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. त्यामध्ये रेनकोटचा समावेश आहे.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात शेतकऱ्यांची सोयाबीन अनुदानाची रक्कम थकीत असल्याबाबत

**(३५) * ९५८८७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात गतवर्षीच्या खरीपात सोयाबीनचे तीन लाख हेक्टरवर पेरणीक्षेत्र होते तसेच सरासरीपेक्षा अधिक पावसामुळे उत्पादकता देखील वाढल्याने बाजार समित्यांमध्ये आवक वाढली व व्यापाऱ्यांनी भाव कमी केल्याने दोन हजार रुपये क्विंटल प्रमाणे सोयाबीनची खरेदी करण्यात आल्याने

शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाएवढी रक्कम देखील त्यांना मिळाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत बाजार समित्यांमध्ये विक्री झालेल्या सोयाबीनला अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी अमरावती जिल्हयातील बाजार समीत्यांमध्ये ३८ हजार ७११ शेतकऱ्यांचे ६ लक्ष ८ हजार २८८ क्विंटल सोयाबीन हमीभावापेक्षा कितीतरी कमी भावाने विकला गेल्याने अनुदानासाठी आवश्यक असणारे १२ कोटी १६ लक्ष ५७ हजार ५२० रुपयांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुर असतांना देखील अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनुदान तात्काळ मिळण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हंगाम २०१६-२०१७ मध्ये अनुकुल हवामान व समाधानकारक पाऊस यामुळे सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने बाजार समित्यांमधील आवक वाढली होती. परिणामी बाजारभाव कमी झालेले होते.

(२) व (३) राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १०.०१.२०१७ अन्वये राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना रुपये २००/- प्रति क्विंटल व कमाल २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाप्रमाणे अनुदानाची रक्कम वाटपासाठी दिनांक २६.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार उपलब्ध करण्यात आली असून, अमरावती जिल्हयातील ३८,७९१ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये १२,१६,५७,५२०/- इतके अनुदान दिनांक १५.११.२०१७ पर्यत सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात RTGS द्वारे जमा करण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेबाबत

(३६) * ९५००५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.राहूल पाटील

**(परभणी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिनांक २८ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबविण्यात येत असून त्याद्वारे शेतकऱ्यांची ३४ हजार कोटींची कर्जमाफी करण्यात येणार आहे तथापि जाहिर केलेल्या पहिल्या टप्प्यातील सुमारे ८ लाख ४० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधीच जमा झाला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर कर्जमाफीसाठी राज्यात किती शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत व त्यापैकी किती शेतकरी छाननीत पात्र ठरले असून किती शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कर्जमाफी देण्यात आली आहे व अद्याप किती शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे बाकी आहे तसेच याकामी जिल्हा बँका व राष्ट्रीयीकृत बँकाना किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) तसेच या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना त्यांचा बँक खाते क्रमांक आधार क्रमांकाशी जोडणे अनिवार्य असून त्यामुळे राज्यातील एकूण ८७ लाख शेतकऱ्यांपैकी सुमारे १० लाख कर्जदार शेतकरी बोगस असल्याचे आढळून आले असून त्यामुळे आजमितीस केंद्र व राज्य शासनाचे किती नुकसान झाले आहे,

(४) तसेच अनुसुचित जाती व जमातीचा सुमारे १००० कोटी रु. चा निधी शासनाने कर्जमाफीसाठी वळविला असल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७

रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असून अनुसुचित जाती व जमातीच्या कल्याणकारी योजनांसाठीचा निधी कर्जमाफीसाठी दिल्याने या योजनांना निधी अपुरा पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर माहे जून ते ऑक्टोबर, २०१७ या पाच महिन्यांत राज्यातील १२५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मधील उपलब्ध आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने उक्त सर्व प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार बनावट  शेतकऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ तात्काळ देऊन त्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत व  अनुसुचित जाती व जमातीच्या कल्याणकारी योजनांसाठीच्या निधीमध्ये कपात न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेचा शुभारंभ दिनांक १८/१०/२०१७ रोजी करण्यात आला असून दिनांक ५/१२/२०१७ पर्यंत एकूण १३.४९ लाख शेतकऱ्यांना रू.८६१०.६३ कोटी इतक्या रकमेचे कर्ज माफ करण्यासाठी शासनाकडून संबंधित बँकांना रक्कम वर्ग करण्यात आली आहे. बँकांकडून संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर रक्कमा वर्ग करण्याची कार्यवाही सुरू असून आज अखेर सदरची प्रक्रिया चालू आहे.

(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या अनुषंगाने दिनांक २२/९/२०१७ अखेर ५६.५९ लाख शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राष्ट्रीयकृत बँका यांच्या खाती शासनाने दिनांक २७/११/२०१७ अखेर रक्कम रूपये ८६१०.६३ कोटी एवढी वितरीत केली असून त्यापैकी शेतकऱ्यांच्या कर्ज खाती दिनांक ०५/१२/२०१७ पर्यंत रूपये ५११४२ कोटी एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असून, उर्वरीत रक्कम वर्ग करण्याचे काम सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रूपये २७७१.५३ कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिला असून, राष्ट्रीयकृत, ग्रामीण व खाजगी बँकांना रूपये ५८३९.१० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) याबाबत माहिती घेण्यात येत असून कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर याची निश्चिती होईल.
(४) हे खरे नाही.
(५) महसूल व वन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार माहे जून ते ऑक्टोबर २०१७ या पाच महिन्यात राज्यातील १२५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे स्पष्ट होते.
(६) शासनाने पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत कार्यवाही सुरू केली असून दिनांक ०५/१२/२०१७ अखेर ९.४३ लाख पात्र कर्जदार शेतकऱ्यांच्या खाती रूपये ५१४२ कोटी एवढी रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम शेतकऱ्यांच्या खाती जमा करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चास (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे विद्युत उपकेंद्र उभारण्याबाबत

**(३७) * ९५३९५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चास, दातली, शहा, माळेगाव, विंचूर दळवी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी शासनाने सुमारे १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी मंजूर करून दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी होऊनही मौजे चास येथील उपकेंद्राचे प्रत्यक्षात काम सुरु झाले नसल्याने शेतकऱ्यांना अपुऱ्या दाबाने वीज पुरवठा होणे, वारंवार वीज पुरवठा खंडित होणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) ठाणगाव ११ के.व्ही. फिडरच्या तारा जीर्ण झाल्याने परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असुन त्या जीर्ण तारा बदलण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.उर्जामंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्युत उपकेंद्र उभारण्याबाबत व ठाणगाव फिडरच्या जीर्ण तारा बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे  चास येथील उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) हे खरे आहे.
(४) ठाणगाव ११ के.व्ही. वीज वाहिनीच्या जीर्ण तारा बदलण्यासाठीचे कार्यादेश देण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांनी महावितरण कंपनीचे कोट्यवधी रुपयांची देयके थकविल्याबाबत

**(३८) * ९६८३७ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १ कोटी ४० लाख वीज ग्राहकांनी महावितरण कंपनीचे सुमारे ३३ हजार ६६९ कोटी रुपये वीज देयकांपोटी थकविले असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात वारंवार वीज खंडीत होण्यामुळे महावितरणचे वार्षिक ५२०० कोटींचे तर उद्योग क्षेत्र व कृषी क्षेत्राचे चौपट नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून हे नुकसान थांबविण्याकरीता या क्षेत्रातील तांत्रिकदृष्टया तज्ञांची समिती नेमण्याची मागणी महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू थकबाकी असण्याची कारणे काय आहेत व ती विनाविलंब वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच जाणीवपूर्वक देयके थकित ठेवणाऱ्या ग्राहकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेच्या उपरोक्त मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) तसेच आर्थिकदृष्टया तोटयात असलेल्या महावितरण कंपनीला नफ्यात आणण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीच्या माहे ऑगस्ट, २०१७ अखेरीस चालू स्थितीतील १,१३,००,१९५ ग्राहकांची थकबाकी रु. २७,९३५/- कोटी तसेच ३२,८३,९०६ कायमचा विद्युत पुरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांची थकबाकी रु.६,५६० कोटी अशी एकूण १,४५, ८४,१०१ ग्राहकांची एकूण थकबाकी रु. ३४,४९५/- कोटी एवढी आहे.
(२) याबाबत मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३), (४) व (५) एकूण रक्कमेच्या थकबाकीपैकी ७३% एवढी थकबाकी पाणीपुरवठा, रस्ता दिवाबत्ती व कृषीपंपधारक ग्राहकांची असून कृषी ग्राहकांची थकबाकी भरणा करण्यासाठी “मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७” ही योजना महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. तसेच घरगुती, व्यापारी व औद्योगिक थकबाकीदार विद्युत ग्राहकांच्या थकबाकी वसुलीकरिता महावितरणामार्फत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

महावितरण कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, कार्यक्षमतेत सुधारणा आणणे, वसुली क्षमता वाढविणे, वितरण हानी कमी करणे, बिलींगमध्ये सुधारणा तसेच महसुलात वाढ करण्यासाठी महावितरणतर्फे स्वतंत्र बिलींग व महसूल विभागाची स्थापना करणे तसेच महसुली खर्चात कपात करणे अशा विविध उपाययोजना महावितरणमार्फत केल्या जात आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात नविन शासकीय वसतीगृह मंजूर करण्याबाबत

**(३९) * १०१२०९ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त विशेष बाब म्हणून नविन शासकीय वसतीगृह मंजूर करण्यासाठीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने नवीन वसतीगृह मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) शासन निर्णय दि.१६/१२/२०१५ अन्वये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त राज्यात ५० मागासवर्गीय मुलींची नवीन शासकीय वसतिगृह चालु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील मागासवर्गीय मुलांसाठी सुरु केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना निधीअभावी बंद झाल्याबाबत

**(४०) * १००२३८ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणाकरिता गतवर्षी शासनाने सुरु केलेली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना पहिल्याच वर्षी निधीअभावी बंद झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यभरातील सात हजार विदयार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजनेकरिता प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे आदेश दि. १३/१०/२०१७ अन्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, कोल्हापुर यांना आवश्यक तरतुद उपलब्ध करुन दिली आहे.

निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही संबंधीत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचे स्तरावर सुरू आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना बचत गटांमार्फत आहार देण्याबाबत

**(४१) * ९५२०० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ठेकेदारामार्फत पुरवठा केला जाणारा आहार हा निकृष्ट दर्जाचा असल्याचे

निदर्शनास येताच प्रकल्प अधिकारी यांनी या ठेकेदारांवर कारवाई करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना यापुढे ठेकेदारांमार्फत आहार न देता बचत गटामार्फत देण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) भोजन ठेक्यामधील ई-निविदा प्रक्रियेमध्ये भोजन ठेकेदार आणि महिला तसेच सर्वसाधारण बचत गट भाग घेत असून सदरच्या ई-निविदेमध्ये पात्र ठरणाऱ्या न्युनतम दराच्या भोजन ठेकेदार/बचत गटास भोजन ठेके देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीमधील पुष्कर पेट्रोकेमिकल कंपनीतील कामगाराचा विजेच्या धक्क्याने झालेला मृत्यू

**(४२) * ९५१३५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील पुष्कर पेट्रोकेमिकल कंपनीतील एका २३ वर्षीय कामगाराचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीतील विविध रासायनिक कारखान्यांमध्ये गत वर्षभरात अनेक दुर्घटनांचे प्रकार होऊनही याबाबत शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीकडून सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी न घेण्यात आल्यामुळे उक्त दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने उक्त दुर्घटनांना कारणीभूत असणाऱ्या कंपन्यांवर तसेच त्यांचेवर कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर औद्योगिक वसाहतीत ८ रासायनिक कारखान्यात जानेवारी, २०१६ ते ३१ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ८ घटना घडलेल्या असून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्याकडून संबंधित कारखान्यांच्या ०८ भोगवटादार व २ कारखान्यांच्या व्यवस्थापकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल केलेले आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, रत्नागिरी यांनी दिनांक २३.१०.२०१७ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळास भेट देऊन अपघाताची चौकशी केली आहे. सदर चौकशीत असे आढळून आले की, घटनास्थळी असलेली विद्युत संचमांडणी (पंप मोटर) सुरक्षित नव्हती. मोटरचा टर्मिनल बॉक्स असुरक्षित अवस्थेत होता. त्यावर पाणी पडल्यामुळे विद्युत क्षरण होऊन सदर अपघात झाला.

विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी मे.श्री पुष्कर केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर ही कंपनी अपघातास कारणीभूत असल्यामुळे, दिनांक २५.१०.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस व अपघात स्थळावर आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी दिनांक २३.१०.२०१७ अन्वये ज्ञापन दिले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# पाटण (जि.सातारा) तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील रस्त्यांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४३) * ९६७६० श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात सह्याद्रीच्या पर्वतरांगावर मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या पवनचक्की प्रकल्पांकरिता होत असलेल्या अवजड वाहतूकीमुळे ग्रामीण आणि डोंगरी भागातील ग्रामीण रस्त्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या पुनर्बांधणीकरीता शासनाच्या ऊर्जा विभागाने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणातर्गंत निधी उपलब्ध करुन देणेविषयी मा.ऊर्जामंत्री यांचेकडे दिनांक ०६ जून, २०१६, दिनांक २२ मार्च, २०१७, दिनांक ०५ एप्रिल, २०१७, दिनांक २६ एप्रिल, २०१७ व दिनांक १० जुलै, २०१७ रोजीच्या पत्रांद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांचे प्रस्ताव तात्काळ पाठविणेबाबत व या रस्त्यांच्या पुनर्बांधणीकरीता आवश्यक असणारा निधी तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी मा.ऊर्जा मंत्री यांनी मान्य केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निधी अद्यापही उपलब्ध झाला नसून या रस्त्यांच्या पुनर्बांधणीला आवश्यक असणारा निधी देणेसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) हरित ऊर्जा निधी अंतर्गत वित्त वर्ष २०१७-१८ मध्ये निधी अर्थसंकल्पीत झाला असून विभागाद्वारे प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्धतेनुसार वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा होत नसल्याबाबत

**(४४) * ९६०५२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व लगतच्या परिसरातील विद्युत वाहक तारा व खांब जिर्ण झालेले असून यामध्ये वारंवार होणारे बिघाड तसेच अभियंता व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा यामुळे गेल्या ५ ते ६ महिन्यापांसून शेतकऱ्यांना होणारा विज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धामणगांव बढे, राजुर, रोहिणखेड, तपोवन, पांगरखेड, सोनबरड, बनगीवस्ती या परिसरात स्वतंत्र सर्कीटद्वारे विज पुरवठा करून शेतकऱ्यांना सुरळीत विज पुरवठा करणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक अभियंता महावितरण कंपनी बुलडाणा यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नाधीन मुद्द्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे ऑगस्ट, २०१७ मधील शेवटच्या आठवड्यापासून कृषीपंपाचा भार वाढल्यामुळे धामणगांव बढे व परिसरातील काही भागातील शेतक-यांचा वीज पुरवठा खंडीत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

धामणगांव बढे वितरण केंद्राअंतर्गत रिक्त असलेली कनिष्ठ अभियंत्याची जागा नुकतीच भरण्यात आलेली असून संबंधित कनिष्ठ अभियंता दिनांक २०.११.२०१७ रोजी रुजू झाला आहे. याव्यतिरिक्त धामणगांव बढे वितरण केंद्राअंतर्गत तांत्रिक कर्मचाऱ्यांची एकूण १२ पदे मंजूर असून त्यापैकी ६ पदे रिक्त आहेत व ही रिक्त पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) धामणगांव बढे व परिसरातील राजूर, रोहिणखेड, तपोवन, पांगरखेड, सोनबरड, बनगीवस्ती या भागात शेतक-यांना सुरळीत ८ तास वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने ११ के.व्ही धामणगांव बढे कृषी फिडरवर खांडवा ते बामनदा अशी एकूण १.५ कि.मी. नवीन ११ के.व्हीची वीज वाहिनी उभारणीचे काम महावितरण कंपनीमार्फत तातडीने हाती घेण्यात आले. सदरचे काम दिनांक १५.११.२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले असून सद्यस्थितीत शेतकऱ्यांना ८ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरळीतपणे करण्यात येत आहे.

तसेच ११ के.व्ही. उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनीच्या तातडीच्या दैनंदिन दुरुस्तीकरिता मोताळा उपविभागासाठी देखभाल व दुरुस्ती (मेंटेनन्स) करण्याकरिता ई-निविदेद्वारे वार्षिक कंत्राट देण्यात आलेले आहे. त्याअंतर्गत आकस्मिक/देखभाल व दुरुस्ती (मेंटेनन्स) स्वरुपाची कामे तातडीने करुन घेतली जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिसवली (जि.ठाणे) गावात उच्च दाबाची तार अंगावर पडून तरुणाचा झालेला मृत्यू

**(४५) * ९६१९६ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-शिळ मार्गावर असलेल्या पिसवली (जि.ठाणे) गावात घराजवळून जाणारी उच्चदाबाची तार जितेंद्र तिवारी यांच्या अंगावर पडून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांच्या नातेवाईकांनी करुन त्यांच्या मृतदेहासह महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृत व्यक्तीच्या नातेवाईकास भरपाई देण्याबाबत व रायगड जिल्हयातून मुंबईकडे वीज पुरवठा करणारी उच्चदाबाची तार कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदरील घटना पिसवली गावात घराजवळून जाणाऱ्या उच्चदाब वाहिनीची तार अंगावर पडून झालेली नाही.

दिनांक ०४.०९.२०१७ रोजी शिळरोडने कल्याणकडे जाणाऱ्या मार्गावर देशमुख होम्स, नेतीवली, शिळरोड कल्याण पूर्व येथील रोड क्रॉस करुन जाणारी उपरी इंटरनेट केबल व त्यासोबत जोडलेली जीआय वायर, सदर मार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात ट्रकमध्ये अडकल्याने तुटली. तुटलेल्या जीआय वायरचा एक भाग त्याखालून जाणाऱ्या उच्चदाब वाहिनीच्या तारेस स्पर्श होऊन अंधातरी लोंबकळत राहिला. लोंबकळलेली तार अधांतरी राहिल्यामुळे व जमिनीच्या संपर्कात न आल्यामुळे वीज वाहिनी चालू राहिली व त्यामुळे सदरचा अपघात घडला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विद्युत निरीक्षक, ठाणे २ यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली असून संबंधित इंटरनेट केबल ऑपरेटर्सना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच महावितरण कंपनीसही नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) तातडीची आर्थिक मदत म्हणून रु. २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) मृत व्यक्तींच्या वारसास देण्यात आले आहेत. आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाई रक्कम रु. ३,८०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख ऐंशी हजार फक्त) धनादेशाद्वारे कायदेशीर वारसास प्रदान करण्यात येईल.

धोकादायक विद्युत संचमांडणी व उपरी तारमार्ग यांचे नियमित सर्वेक्षण केले जात असून, त्याची सचित्र माहिती वीज वितरण कंपनीच्या संबंधित विभागास, उचित दुरुस्ती करण्यासाठी, शासनाच्या विद्युत निरीक्षणालयामार्फत पाठविण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांकडून सर्व्हिस लाईन चार्जेस आणि मीटर घेण्याच्या आकारापोटी वसूल केलेली रक्कम परत करण्याबाबत

**(४६) * ९६१२१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज ग्राहकांकडून दिनांक २० जानेवारी, २००५ ते दिनांक ३० एप्रिल, २००७ या कालावधीत महावितरणने सर्व्हिस लाईन चार्जेस आणि मीटर घेण्याच्या आकारापोटी वसूल केलेली सुमारे ३६७ कोटींची रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने व मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यभरातील ग्राहकांकडून प्रतिवर्षी सुरक्षा ठेवीच्या नावाखाली दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर महावितरणकडे ६०७५ कोटी रुपये जमा करण्यात आले असून या ठेवींवर कालावधीनुसार ग्राहकांना १०.७५ टक्क्यांपर्यंत व्याज देण्याबाबत राज्य विद्युत नियामक आयोगाचे निदेश असूनही वीज ग्राहकांना व्याज दिले जात नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणने वीज ग्राहकांकडून घेतलेल्या सुरक्षा ठेव रकमेवरील व्याजाबाबत तसेच सर्व्हिस लाईन चार्जेस आणि मीटर घेण्याच्या आकारापोटी ग्राहकांकडून वसूल केलेली रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) माहे मार्च, २०१७ अखेर महावितरण कंपनीकडे सर्व वर्गवारीच्या ग्राहकांची मिळून एकूण रु.६०७५.६३ कोटी एवढी सुरक्षा ठेव रक्कम जमा आहे. सदर

रकमेवर सन २०१७-१८ या वर्षामध्ये मा.विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार दिनांक ०१.०४.२०१६ ते ३१.१२.२०१६ या कालावधीकरिता १०.८०% दराने व दिनांक ०१.०१.२०१७ ते ३१.०३.२०१७ या कालावधीकरिता १०.७५% व्याज ग्राहकांना अदा करण्यात आले आहे.

(३) मा.आयोगाच्या आदेशानुसार, सर्व्हिस लाईन आकार, आऊट राईट कॉन्ट्रीब्युशन आकार व मीटरची किंमत वीज ग्राहकांना व्याजासह परतावा करण्याकरिता महावितरण कंपनीने दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी परिपत्रकाद्वारे क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मतिमंद मुलांसाठी असलेल्या वसतिगृहाच्या अनुदानाची रक्कम वाढविण्याबाबत

**(४७) * ९६५११ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मतिमंद मुलांसाठी असलेल्या वसतिगृहाच्या अनुदानाची रक्कम वाढविण्याबाबतचा मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशकानुसार परिपोषण रक्कमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावाची शासनाने छाननी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप अहवालाची छाननी करुन त्यानुसार निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) होय.
(३) महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या अनुदानीत मतिमंद बालगृहे संलग्नीत शाळा/कर्मशाळा या चौदा संस्थांमधील प्रवेशितांना परिपोषण अनुदान सुधारीत करण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीचा निर्णय होईपर्यंत एप्रिल, २०१७ पासून प्रतिमाह, प्रतिप्रवेशित रु.२०००/- या दराने परिपोषण अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील जी नेक्स्ट सोल्युशन मीटर रीडिंग एजन्सीने महावितरण कंपनीचे नुकसान केल्याबाबत

**(४८) * ९५९९९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील जी नेक्स्ट सोल्युशन मीटर रीडिंग एजन्सीने महावितरणच्या सेंट मेरी उपविभागातंर्गत ७ हजार ७०९ वीज ग्राहकांना झिरो युनिट देयके वितरीत केल्याने शासनाचे सुमारे १ कोटी ७१ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एजन्सीने यापूर्वी महावितरण कंपनीकडे जमा केलेला बँक हमीचा दस्त चोरून त्याऐवजी दुसऱ्या बँकेचा बनावट दस्त जमा करून महावितरण कंपनीची फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार आर्थिक नुकसान करणाऱ्या दोषी एजन्सीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीच्या रास्तापेठ शहर मंडळांतर्गत सेंट मेरी उपविभागातील वीज ग्राहकांचे मोबाईल ॲपद्वारे फोटो रिडींग घेण्यासाठी पीसी-३ व ४ करिता मे. जी नेक्स्ट टेक सोल्युशन, पुणे यांना मे, २०१७ मध्ये कामाचे आदेश देण्यात आले होते. माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये पीसी ३ चे बिलींग करताना ७,७०९ ग्राहकांना शून्य युनिटची वीज बिले दिल्याचे निदर्शनास आले. तथापि सदर ग्राहकांना सप्टेंबर, २०१७ मध्ये त्यांनी वापरलेल्या वीजेच्या युनिटप्रमाणे बिले आकारण्यात आली आहेत. त्यामुळे कंपनीचे कुठलेही महसुलाचे नुकसान झालेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर एजन्सीवर भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३८०/४२०/४६५/४६७/४६८/४७१/३४ कलमान्वये FIR No. ०१८३ दिनांक १४.०९.२०१७ रोजी समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच एजन्सीच्या चुकीमुळे ७,७०९ ग्राहकांना शून्य युनिटचे वीज बिल दिल्याचे निदर्शनास आल्याने मे. जी नेक्स्ट टेक सोल्युशन एजन्सीच्या कामाचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. तसेच सदर एजन्सीला काळया यादीत टाकण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे व त्यानुसार सदर एजन्सीला काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयात सिध्दांत एंटरप्रायजेस या खासगी कंपनीचे कर्मचारी चुकीचे मीटर रिडींग घेत असल्याबाबत

**(४९) * ९५१२७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात महावितरणने मीटर रिडींग घेण्याचे काम सिद्धांत एंटरप्रायजेस या खाजगी कंपनीवर सोपविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीचे कर्मचारी चुकीचे रिडींग घेत असल्यामुळे येथील वीज ग्राहकांना सुमारे १ हजार ते ७० हजारांपर्यंत वीज देयके आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येथील वीज ग्राहकांना आलेली वाढीव वीज देयके कमी करुन देण्याबाबत तसेच चुकीचे रिडींग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महावितरण कंपनीच्या धुळे ग्रामीण उपविभागातील अधिकारी यांनी मे. सिध्दांत एंटरप्रायजेस या एजन्सीचे कर्मचारी श्री. विठ्ठल लक्ष्मण पाटील, रा. गरताड, ता. जि. धुळे यांच्या विरुध्द धुळे तालुका पोलीस स्टेशन, ता.जि.धुळे येथे गुन्हा क्र. २२०/१७ दिनांक १४.०७.२०१७ रोजी भा.दं.वि. कलम ४२० व ४६५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृषी पंपाच्या विद्युत जोडण्या महावितरण कंपनीकडून प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * ९६००९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी सन २०१४ मध्ये २०८ कोटी रु. निधीची मागणी करण्यात आली असून सदर निधी अद्यापही प्राप्त झाला नसल्यामुळे सुमारे १५ हजार कृषी पंपाच्या विद्युत जोडण्या निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २०१२ पासून आजपर्यंत हजारो वीज पंपाच्या जोडण्या प्रलंबित असून गडहिंग्लज विभागामध्ये १७९४ प्रकरणे, इचलकरंजी विभागामध्ये १९३ प्रकरणे, जयसिंगपूर विभागामध्ये १९६०, ग्रामीण १ मध्ये २५०९, ग्रामीण २ मध्ये २६०६, तर कोल्हापूर शहरामध्ये १३ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विज जोडण्यांकरीता अंदाजे २०८ कोटी रुपयांची आवश्यकता असून या मागणीचा प्रस्ताव एप्रिल महिन्यामध्ये मुख्य अभियंता कार्यालयाकडून शासनाकडे पाठविण्यात आला असून उक्त प्रस्तावास कधीपर्यंत मंजूरी मिळणे अपेक्षित आहे,
(४) तसेच काही विभागात शेतकऱ्यांना शेतीपंपाचा परवाना मिळूनही जोडणी व मीटर देण्यास महावितरण कंपनीकडून दिरंगाई होत असल्याचेही माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना वीज जोडणी व मीटर देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच कोल्हापूर व सांगली जिल्हयातील अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने निधी उपलब्ध करुन वीज जोडणी व मीटर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) कोल्हापूर व सांगली जिल्हयामध्ये ऑक्टोबर, २०१७ अखेर अनुक्रमे ८,४६२ व १५,७७५ असे एकूण २४,२३७ कृषीपंप पैसे भरुन अर्ज प्रलंबित आहेत.
(२) कोल्हापूर जिल्हयामधील गडहिंग्लज विभागामध्ये १८८२, इचलकरंजी विभागामध्ये १६९, जयसिंगपूर विभागामध्ये ११३३, ग्रामीण विभाग-१ मध्ये २५७६, ग्रामीण-२ मध्ये २६९२, कोल्हापूर शहरामध्ये १० असे एकूण ८४६२ कृषीपंप ऑक्टोबर, २०१७ अखेर पर्यंत पैसे भरुन अर्ज प्रलंबित आहेत.

(३) राज्यात प्रलंबित कृषीपंपांना नवीन वीज जोडणी देण्यासाठी आवश्यक निधी उभारुन त्यामधून सदरची कामे करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

(४) सद्यस्थितीत मीटर उपलब्ध असून शून्य पोल लागत असलेल्या (only service connection) कृषीपंपाना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) कोल्हापूर व सांगली जिल्ह्यामध्ये सन २०१६-१७ मध्ये अनुक्रमे ८३७६ व ६९३६ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर जिल्ह्यांमध्ये सन २०१७-१८ मध्ये ऑक्टोबर, २०१७ अखेर अनुक्रमे २०३३ व ७१० कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित कृषीपंपाना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील मुलभूत सुविधांबाबत

**(५१) * ९६२६८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहात मुलभूत सुविधांचा अभाव असून वसतिगृहात शिक्षक व स्त्री अधिक्षिका उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहात असलेल्या ५१४ विद्यार्थीनींना सद्य:स्थितीत फक्त १०० पलंग उपलब्ध असून गाद्या व सतरंजी इ. साहित्य पुरविण्यात आलेले नाही तसेच वसतिगृहाला संरक्षक भिंत नसल्याने मुलींच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतिगृहाच्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, उक्त गैरसोयी दूर करुन विद्यार्थीनींना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) शासकीय आश्रमशाळा देवगाव, ता.इगुतपरी, जि.नाशिक येथे शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून तेथे सर्व सोयी सुविधा पर्याप्त प्रमाणात उपलब्ध आहेत. तसेच मुलींच्या वसतिगृहाच्या नवीन इमारतीचे बांधकामाबाबत कार्यवाही सुरु आहे.

शासकीय आश्रमशाळा देवगांव, ता.इगतपुरी, जि.नाशिक या शाळेवर दि.२१.११.२०१७ रोजीच्या आदेशान्वये स्त्री अधिक्षिका या पदावर नेमणूक करण्यांत आली आहे. सदर शाळा निवासी आश्रमशाळा असल्याने ५०८ विद्यार्थीनी निवासी आहेत. सद्य:स्थितीत १०० पलंग उपलब्ध आहेत. उर्वरीत मुलींसाठी पलंग व गाद्यांसाठी मुख्याध्यापकांकडून लेखी मागणी घेण्यात आली आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना बेडींग साहित्य खरेदी थेट निधी त्यांचे खात्यात जमा करण्यात आला असून त्यामधून विद्यार्थ्यांनी बेडींग साहित्य (सतरंजी, चादर, बेडशीट, ब्लकेट) खरेदी केलेली आहे.

तसेच सदर वसतीगृहाच्या सरंक्षण भिंतीचे शाळेला चारही बाजुने बांधकाम केलेले असून संरक्षण भिंतीला सुरक्षा प्रवेशद्वार बांधण्यात आले आहे. वसतीगृहातील उर्वरित संकुलाचे बांधकामाचे अंदाजपत्रक सादर करण्यांत आले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील एकाधिकार खरेदी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५२) * ९६११८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयामध्ये मेळघाटच्या धारणी व चिखलदरा या तालुक्यात आदिवासी विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या एकाधिकार खरेदी योजनेतंर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-२०१७ दरम्यान तूर, हरभरा व सोयाबीनच्या खरेदी-विक्री व्यवहारात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन व्यवस्थापकाच्या बेजबाबदारपणामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले असून शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीत एकुण २१९०.७७ क्विंटल सोयाबीन खरेदी केले होते. ज्याची सरासरी बीईपी किंमत ३४६७ प्रती क्विंटल इतकी होती. तर विक्री किंमत ३४७७ प्रती क्विंटल इतकी होती.

याच कालावधीत एकुण ४१४० क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला होता, ज्याची सरासरी बीईपी किंमत ५०२१ रूपये प्रती क्विंटल तर सरासरी विक्री किंमत ५०५२ रूपये इतकी होती.

तर सन २०१५-१६ या कालावधीत एकुण २६३ क्विंटल तुर खरेदी करण्यात आली होती. ज्याची सरासरी बीईपी किंमत ६०११ रूपये प्रती क्विंटल तर सरासरी विक्री किंमत ६०६१ रूपये इतकी होती.

तुर, हरभरा व सोयाबीन याची विक्री खरेदी किंमतीपेक्षा जास्त दराने केली असल्याने खरेदी विक्री व्यवहारात गैरव्यवहार झालेला नाही.

(२) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) लागु नाही.

(४) लागु नाही.

-----------------

## राज्यात कोळशाच्या टंचाईमुळे सुरु असलेले भारनियमन

(५३) * ९५३१७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नारायण पाटील (करमाळा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील

**(एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या योग्य नियोजनाअभावी राज्यात कोळशाची अभूतपूर्व टंचाई निर्माण झाली असून औष्णिक वीजनिर्मिती संच बंद ठेवावे लागल्यामुळे राज्यभरात माहे ऑक्टोबर, २०१७ च्या सुरुवातीपासूनच भारनियमन लागू करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज उत्पादन केंद्रातील ३० पैकी १५ वीजनिर्मिती संच विविध कारणांमुळे तर ८ संच कोळशाच्या तुटवड्यामुळे बंद असल्याने राज्यातील ठाणे, नवी मुंबई, पुण्यासह सर्व महानगरामध्ये दिनांक ५ ऑक्टोबर पासून तातडीचे भारनियमन सुरु झाले असून शहरी भागात तीन तास तर ग्रामीण भागात नऊ तासापर्यंत वीजकपात करण्यात येत आहे व राज्यात २२०० ते २३०० मेगावॅटचे भारनियमन होत असल्याने कृषी पंपाना होणाऱ्या वीज पुरवठ्यातही दोन तास कपात करण्यात आली आहे तसेच उद्योग क्षेत्रात वीज कपातीमुळे कामाचे तास कमी करावे लागले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या विविध भागात स्थानिक पातळीवर वीज यंत्रणेचे जाळे सक्षम करण्यासाठी ५० हजार कोटी रुपये खर्च करुनही वीज खंडीत होण्याच्या घटनांमध्ये दुप्पटीने वाढ झाल्याचे माहे ऑगस्ट,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच महावितरणने महानिर्मितीबरोबरच खाजगी आणि केंद्रीय वीज प्रकल्पातून २९४३० मेगावॅट वीजेच्या खरेदीसाठी करार केले असून रोज १६ हजार ४७० मेगावॅट विजेची खरेदी करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा

त्या दरम्यान घेतला असून वीज खरेदी करण्यासाठी किती निधीची तरतूद शासनाला करावी लागणार आहे,
(५) असल्यास, योग्य नियोजन केलेले नसल्याने झालेल्या कोळशाच्या अभूतपूर्व टंचाईची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोळशाचे योग्य नियोजन करण्यासाठी व भारनियमनाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे ऑक्टोबर, २०१७ या महिन्यात काही काळासाठी दिनांक ३ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान तात्पुरते भारनियमन लागू करण्यात आले होते.
(२) राज्यातील महानगरांमध्येही दिनांक ४ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर दरम्यान काही कालावधीसाठी भारनियमन करण्यात आले होते.
(३) हे खरे नाही.
(४) महावितरण कंपनीने महानिर्मितीबरोबर खाजगी आणि केंद्रिय वीज प्रकल्पातून ३१,१९७ मे. वॅ. वीजेच्या खरेदीसाठी दिर्घकालीन करार केलेले आहेत. परंतु माहे ऑक्टोबर महिन्यात प्रामुख्याने कोळशा अभावी वीजेची उपलब्धता १५००० ते १६५०० मे. वॅ. एवढी होती. लघुकालीन निविदेद्वारे १५ ऑक्टोबर पर्यंत १४५० मे. वॅ. व तद्नंतर ३१ ऑक्टोबर पर्यंत ११०० मे.वॅ. वीज खरेदी करण्यात आली व गरजेनुसार काही कालावधीसाठी पॉवर एक्सेंजमधून ०१ दिवस अगोदर मागणी नोंदवून (Day Ahead basis) वीज खरेदी करण्यात आली.
(५) महावितरणने भारनियमनाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालील उपाययोजना केल्या आहेत :-

(अ) लघुकालीन निविदेद्वारे १५ ऑक्टोबरपर्यंत १४५० मे. वॅ. व तद्नंतर ३१ ऑक्टोबर पर्यंत ११०० मे.वॅ. वीज खरेदी करण्यात आली व गरजेनुसार काही कालावधीसाठी पॉवर एक्सेंजमधून ०१ दिवस अगोदर मागणी नोंदवून (Day Ahead basis) वीज खरेदी करण्यात आली.

(ब) महावितरणने मा. वीज आयोगाकडे रु. ४ प्रति युनिटपेक्षा जास्त दराने वीज खरेदी करण्यासाठी याचिका दाखल करून त्यानुसार म. वीज नियामक आयोगाची परवानगी घेतली. लघुकालीन खरेदीद्वारे माहे ऑक्टोबर महिन्यात एकूण ६१९.७४ दशलक्ष युनिट रु. ३.९६ प्रति युनिट दराने खरेदी केली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सूत गिरण्यांचे कर्ज माफ करण्याबाबत

**(७४) * ९७३६२ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सूत गिरण्यांचा व्यवसाय वाढीव वीजदर व शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बंद होण्याच्या मार्गावर असल्याने या सूत गिरण्यांचे कर्ज माफ करण्याची मागणी सूत गिरणी अध्यक्षांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सूत गिरण्यांच्या व्यवसायाला उर्जितावस्था आणण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही, राज्यातील सूत गिरण्यांचा व्यवसाय वाढीव वीजदर व सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे बंद होण्याच्या मार्गावर नसून, सहकारी सूत गिरण्यांनी मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे स्वभागभांडवल व वित्तीय संस्थेकडून कर्जाची उभारणी केली नसल्याने व शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देऊनही संस्थांनी प्रकल्प पूर्ण क्षमतेने उत्पादनाखाली न आणल्याने वर्धनक्षमता कमी होऊन बंद झाल्या आहेत.
(२) व (३) सूत गिरण्यांचा व्यवसाय उर्जितावस्थेत आणण्याकरिता शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२९.६.२०१६ अन्वये वीज दरात सवलत देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दि.११.१.२०१७ नुसार सहकारी सूत गिरण्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शासकीय भाग भांडवलावर प्राप्त

होणारे व्याज देय शासकीय भागभांडवलात समायोजित (Interest Capitalization) करण्यात येत नसून यापूर्वी समायोजित करण्यात आलेले व्याज शासकीय भागभांडवल स्वरुपात परत करण्यात येत आहे.

तसेच सहकारी सूत गिरण्या सूरळीत चालाव्यात तसेच आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात याकरीता प्रती चाती रु.३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्थेकडून / रा.स.वि.नि. कडून त्यांचे स्तरावर ५ वर्षाकरिता कर्ज घेतल्यास त्यावरील ५ वर्षाचे कमाल १२% पर्यंतचे व्याज शासन भरणार आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(५५) * ९५६०६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर व जळगांव-जामोद या तालुक्यात (जि.बुलढाणा) आदिवासी विद्यार्थ्यांनी एएनएम व जीएनएम पदविका परीक्षेसाठी प्रवेश घेतल्यास शिष्यवृत्ती, मोफत पुस्तके, ड्रेस, जेवणाची व निवासाची व्यवस्था व नोकरीची हमी अशा आश्वासनांची हमी देवून दलाल शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माध्यमातून दलालांनी व शैक्षणिक संस्थानी विदयार्थ्यांची फसवणूक करुन त्यांना प्रवेशित करुन घेतले आहे तसेच उक्त तालुक्यातील शैक्षणिक संस्थांनी १५३ विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे अनधिकृतकरित्या ताब्यात ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार संबंधितावर कारवाई करण्याबाबत व सदर विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शैक्षणिक दलालांच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

शैक्षणिक संस्थांनी कागदपत्रे न दिल्याबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान पंचवार्षिक योजना बंद केल्याने मराठवाड्यातील उद्योजकांचे झालेले नुकसान

**(५६) * ९५२४७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान पंचवार्षिक योजना दोन वर्षातच म्हणजे दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदर योजना बंद केल्यामुळे बीड जिल्हयातील ७ तसेच मराठवाडयातील ७०० उद्योगांच्या सरासरी ३५० कोटींच्या प्रकल्पांनादिवाळखोर जाहिर करुन बँकांनी ते बंद केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्योग नवीन योजनेत समाविष्ट करुन पूर्ववत सुरु करावेत तसेच या उद्योजकांना अनुदान, मागील चार वर्षाचे बँक व्याज व नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान योजनेच्या निकषान्वये ज्या १११ प्रस्तावांना पूर्व संमती देण्यात आली होती, त्यापैकी ६४ प्रस्तावांना पुर्ण अनुदान देण्यात आलेले आहे. उर्वरीत ४७ प्रस्तांवातील ज्या प्रस्तावांचे अशत: अनुदान प्रलंबित आहे त्यांना नवीन योजनेनुसार अनुदान देण्यात येत आहे. त्यामुळे सदर योजना बंद झाल्यामुळे मराठवाडयातील उद्योग दिवाळखोरीत निघण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.